परीशिष्ट - ९

# महाराष्ट्र शासन

गोपनीय

क्रमांक : डीएमसी-२००९/(२)/का.१६
विधि व न्याय विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ९ जानेवारी, २०१२.

**प्रति,**

**सचिव,**
**देवस्थान व्यवस्थापन समिती,**
**पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर.**
**बलभीम को-ऑप. बँक बिल्डींग, सी.टी.एस. नं. २४०२/३,**
**"ए" वार्ड, शिवाजी पेठ, कोल्हापूर.**

**विषय :** देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र कोल्हापूर यांच्या आस्थापनेवरील कर्मचा-यांच्या बेकायदेशीर भरतीबाबत.
संदर्भ :- आपले पत्र क्र.देव जावक १८९/२०११, दिनांक २३.११.२०११.

**महोदय,**

उपरोक्त विषयावरील आपले संदर्भाधिन पत्र पहावे.

२. देवस्थान व्यवस्थापन समितीच्या आस्थापनेवर भरती करण्यात आलेल्या १८ कर्मचा-यांनी औद्योगीक न्यायालय, कोल्हापूर येथे दाखल केलेल्या कंप्लेन्ट अर्ज प्रकरणाची वस्तुस्थिती उक्त पत्रान्वये आपण अवगत केली आहे. प्रस्तुत प्रकरणी देवस्थान समितीचे म्हणणे न्यायालयास सादर केलेले दिसत नाही. मा.न्यायालयाने प्रस्तुत प्रकरणी अर्जावर प्रतिवाद होईपर्यंत कर्मचा-यांना कामावरुन कमी करण्यास मनाई केलेली आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणी शासनाने वेळोवेळी दिनांक ६ मे, २००९, ७ ऑक्टोबर, २०१०, ६ जून, २०११ च्या शासन पत्रान्वये दिलेले निर्देश विचारात घेऊन औद्योगिक न्यायालयासमोर देवस्थान व्यवस्थापन समितीचे म्हणणे तातडीने सादर करण्यात यावे.

३. तसेच देवस्थान समितीच्या आस्थापनेवर बेकायदेशीरपणे भरती केलेल्या कर्मचा-यांच्या नियुक्तीस मान्यता न देता उचित कार्यवाही करण्याबाबत शासन पत्र दिनांक ७.१०.२०१०, ६.६.२०११ अन्वये आपणास निदेश देऊनही शासनाच्या निर्देशाचे पालन करण्यास विलंब का लागला याबाबत सविस्तर खुलासा शासनास तातडीने सादर करण्यात यावा, ही विनंती.

**आपला,**

**( ल. वि. सावंत )**
**कार्यासन अधिकारी**

O/C

C:\Documents and Settings\ac231609\My Documents\Kudal\DMC Dmc Letters.lwp 462

९/१/२०१२